**<u>महत्वाचे</u>**

**परिपत्रक**

जा.क्र.सकस/अजाउयो/गटईस्टॉल/सु.शा.नि./
२००७-०८/का-१४/१९८
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
दिनांक ११ मार्च, २००८

प्रति,
१) विभागीय समाज कल्याण अधिकारी, सर्व.
२) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सर्व.

**विषय:** <u>गटई कामगारांना लोखंडी पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना.</u>
योजनेची व्याप्ती वाढवून निकषामध्ये सुधारणा करणेबाबत.
**संदर्भ:** शासन निर्णय क्रमांक गटई-२००६/प्र.क्र.२०९/मावक-२,
दिनांक १३ फेब्रुवारी, २००८

गटई कामगाराना लोखंडी पत्र्याचे स्टॉल पुरविणे या योजनेतर्गत सन २००७-०८ या आर्थिक वर्षापासून सदर योजना ग्रामपंचायत व **"क"** वर्ग नगरपालिका क्षेत्रासह या योजनेची व्याप्ती **"अ"** वर्ग व **"ब"** वर्ग नगरपालिका आणि छावणीक्षेत्र (कॅन्टोन्मेंट बोर्ड) व महानगरपालिका क्षेत्रात वाढविण्यांचा निर्णय संदर्भीय शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. ***(प्रत संलग्न)***

गटई कामगाराना लोखंडी पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेच्या नियम व अटी शासन निर्णयासोबतच्या ***परिशिष्ट - अ*** मध्ये नमूद केलेल्या असून विहित अर्जाचा सुधारीत नमूना ***परिशिष्ट-ब*** मध्ये जोडलेला आहे. त्यासअनुसरुन सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरिता आपल्या विभागाची/जिल्हयाची सुधारीत मागणी असल्यास व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई याचेकडे त्वरीत संपर्क साधावा. आर्थिक वर्ष संपत आलेले असल्याने सदरील बाबीस सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे.

**सोबत- संदर्भांकित शासन निर्णय प्रत.**

**सहसंचालक (अजाउयो)**
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत-**

१) मा. श्री. स. स. बेनके अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना संदर्भांकित शासन निर्णयाचे अनुषगाने माहितीस्तव.

२) व्यवस्थापकीय संचालक, संत राहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

